# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड. जि. अमरावती.

3C

## वार्षिक अहवाल २०१४-२०१५

सन २०१४-१५ मध्ये वर्गवार प्रवेशित विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे.

| अ. क्र | वर्ग | सन २०१४-१५ ची विद्यार्थी संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कला | वाणिज्य | विज्ञान | एकुण |
| १. | प्रथम वर्ष | ३७७ | ३४२ | २५१ | ९७० |
| २. | द्वितीय वर्ष | २१२ | २७८ | २१३ | ७०३ |
| ३. | तृतीय वर्ष | १०६ | १९० | १८० | ४७६ |
| ४. | एम.ए. भाग-१ (अर्थशास्त्र) | ६४ | ० | ० | ६४ |
| ५. | एम.ए. भाग-२ (अर्थशास्त्र) | ३० | ० | ० | ३० |
| ६. | एम.ए. भाग-१ (इंग्रजी) | १४ | ० | ० | १४ |
| ७. | एम.ए. भाग-२ (इंग्रजी) | १२ | ० | ० | १२ |
| ८. | एम.ए. भाग-१ (मराठी) | ३३ | ० | ० | ३३ |
| ९. | एम.ए. भाग-२ (मराठी) | २० | ० | ० | २० |
| १०. | एम.एस्सी. भाग-१ (रसायनशास्त्र) | ० | ० | १८ | १८ |
| ११. | एम.एस्सी. भाग-२ (रसायनशास्त्र) | ० | ० | १५ | १५ |
| १२. | एम.कॉम. भाग-१ (इंग्रजी माध्य.) | ० | ४२ | ० | ४२ |
| १३. | एम.कॉम. भाग-२ (इंग्रजी माध्य.) | ० | ३३ | ० | ३३ |
| | एकुण | ८६८ | ८८५ | ४९७ | २४३० |

**शिष्यवृत्ती व सवलती** :- सन २०१४-१५ मध्ये विद्यार्थ्यांना मिळालेल्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती व सवलती धारक विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शिष्यवृत्ती / सवलतीचे नांव | सन २०१४-१५ ची विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | भारत सरकार शिष्यवृत्ती | १८६२ |
| २. | अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती | ५४ |
| ३. | विद्यार्थी कल्याण निधी (अमरावती विद्यापीठ) | ० |
| ४. | अपंग शिष्यवृत्ती | ० |
| ५. | गुणवत्ता शिष्यवृत्ती | ० |
| ६. | फ्रि शीप | २५ |
| ७. | ई.बी.सी. | ४१ |
| ८. | पी.टी.सी./एस.टी.सी. | ०५ |
| | एकुण | १९८७ |

**शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी :-** सन २०१४-१५ मध्ये पुर्णकालीन ३१, कंत्राटी पध्दतीचे ०८, तासिकेप्रमाणे ९०, असे एकुण १२९ शिक्षक व ४४ शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत.

**ग्रंथालय विभाग:-** या महाविद्यालयाचे ग्रंथालय अभ्यासक्रम व इतर ग्रंथांनी समृध्द असून दरवर्षी त्यामध्ये अद्यावत ग्रंथाची भर पडत आहे. व ते समृध्द होत आहे. ग्रंथालयात प्रमुख विषयावरील मासीके नियतकालीके विकत घेण्यात येतात. व ती प्राध्यापक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातात. ग्रंथालयात ३१ मार्च २०१४ रोजी रु.४०,०८६१२/- ची एकुण ३२०८९ पुस्तके उपलब्ध होती. त्यानंतर १ एप्रील २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीत रु. १,५३,३४५/- ची एकुण ६५९ पुस्तके खरेदी करण्यात आली आहेत. ३१ मार्च २०१५ रोजी रु. ४१,६१,९५७/- किंमतीची एकुण पुस्तके ३२७४८ ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

तसेच ३१ मार्च २०१५ रोजी मासीके व नियतकालीकांची संख्या एकुण ४०० आहे. त्याची किंमत रु. १,३२,४८०/- एवढी आहे. त्यानंतर १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीत रु. ८०००/- किंमतीची एकुण २६ मासिके व नियतकालीके खरेदी करण्यात आली. ३१ मार्च २०१५ रोजी रु.१,४०,४८०/- किंमतीची एकुण ४२६ मासिके व नियतकालीके उपलब्ध आहेत.

Scanned by CamScanner

**खेळ व क्रि डा विभाग :-** शैक्षणिक सत्र २०१४-१५ मध्ये शारीरिक शिक्षण विभागाने आंतरमहाविद्यालयीन खेळ व स्पर्धामध्ये खालील खेळ स्पर्धांमध्ये महाविद्यालयीन खेळाच्या चमुंनी सहभाग नोंदविला.
१. व्हॉलीबॉल २. कबड्डी ३. खो-खो ४. हॅन्डबॉल ५. क्रॉसकन्ट्री ६. मैदानी स्पर्धा ७. कुस्ती ८. वजन उचलणे ९. बॅडमिन्टन १०. बॉक्सींग ११. स्वीमींग १२. क्रि केट इत्यादी मुला मुलींच्या चमुचा सहभाग होता. विविध चमुच्या खेळातील प्रदर्शन पाहता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची चमु तयार करण्यासाठी महाविद्यालयातील चमुतील विद्यार्थ्यांना सिलेक्शन ट्रायल करिता आमंत्रित केले त्यामध्ये १. कबड्डी चमुकरीता :- सुरज रामटेके, बी.एस्सी.भाग-३, भाविक कन्हाळे , बी.एस्सी. भाग-१, वैभव कपीले, बी.कॉम. भाग-३ २. कबड्डी चमुकरीताः- मोवित तेलमोरे, बी.एस्सी. भाग-३ ३. बॅडमिन्टन (मुली) :- कु. स्वाती भिंगारे, बी.एस्सी. भाग-१ , कु. जयश्री काशीकर बी.एस्सी. भाग-१ ४. बॉल बॅडमिन्टन (मुली) :- कु. शुभांगी कावनपुरे . या वर्षी महाविद्यालयाने खेळ व स्पर्धांमध्ये चांगल्या प्रकारे यश प्रात केले आहे.

या सर्व झालेल्या सिलेक्शन ट्रायल मधुन हॅन्डबॉल खेळासाठी अमरावती विद्यापीठ हॅन्डबॉल चमु मध्ये मोवित तेलमोरे याची स्टॅन्ड बाय फर्स्ट तर बॉल बॅडमिन्टन चमुसाठी कु. शुभांगी कावनपुरे हिची सुध्दा स्टॅन्ड बाय फर्स्ट म्हणून निवड करण्यात आली तसेच अमरावती विद्यापीठाने आयोजीत केलेल्या प्रशिक्षण शिबीर सुध्दा पुर्ण केले.

संगाबा अमरावती विद्यापीठ , अमरावती द्वारे आयोजीत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भरारी मारली आहे. २० कि.मी. चालणे या स्पर्धेत प्रणय सुंदरकर , बी.ए.भाग-१ तर १५०० मी. धावने या स्पर्धेत कोमल सिंग बघेल, बी.ए.भाग-२ यानी विद्यापीठाचे सुवर्ण पदक प्राप्त केले व अश्वमेघ क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

श्री. शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत आयोजीत ' शिवाजी ऑलीम्पीयाड स्पर्धा' या मध्ये महाविद्यालयाने व्हॉलीबॉल व बास्केट बॉल या स्पर्धेचे विभागावर आयोजन केले तसेच शिवाजी ऑलीम्पीयाड क्रिडा स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक अशी कामगीरी केली. श्री. शिवाजी ऑलीम्पीयाड क्रि डा स्पर्धेत महाविद्यालयाच्या कबड्डी चमुने विजयी पद प्राप्त केले तसेच व्हॉलीबॉल चमुने उपविजयी पद प्राप्त केले. प्रणय सुंदरकर याने ८०० मी. धावणे मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. कोमल सिंग बघेल याने १५०० मी. धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. कु. रेखा मांगरुळकर हिनी ४०० मी. धावणे स्पर्धेत प्रथम व २०० मी. धावणे मध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. कु. रुपाली राऊत हिने गोळाफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला तर १०० व चक्रफेक या स्पर्धेत तृतीय क्र मांक प्राप्त केला. आकाश सांडे याने गोळाफेक स्पर्धेत तृतीय क्र मांक प्राप्त केला. यावर्षी प्रथमच आंतरमहाविद्यालयीन महाविद्यालयाच्या बॉक्शींग या क्रि डा स्पर्धेत सहभाग घेतला असुन चांगले यश प्राप्त केले आहे. तसचे ८० कि. वजन गटात विशाल धरमठोक याने उपविजयी पद प्राप्त केले व कुनाल बेलसरे याने कास्य पदक प्राप्त केले आहे.

वरिल सर्व यश संपादन करणा-या विद्यार्थ्यांचा १२ जाने. २०१५ रोजी ट्रॅकसूट, शुज, प्रमाणपत्र इ. देवून सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयाचे संचालक शारिरीक शिक्षण प्रा. विनोद तेलमोरे यांची संगाबा अमरावती विद्यापीठ क्रॉसकन्ट्री चमु निवड समिती सदस्य म्हणून निवड झाली. व २०१५-१६ करीता क्रॉसकन्ट्री चमु अध्यक्ष, निवड समिती, म्हणून निवड विद्यापीठाद्वारे करण्यात आली.

**राष्ट्रीय सेवा योजनाः-** सन २०१४-१५ मध्ये डॉ.ए.के.सोळंके, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी , डॉ. आर.एस.वाडबुधे, रा.से.यो. सह. कार्यक्रम अधिकारी, डॉ. सुवर्णा गाडगे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी, प्रा. माधुरी उमेकर रा.से.यो. सह. कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्य केले.

रा.से.यो. विभागाचे वतीने दिनांक २५.०९.२०१४ व ०३.०१.२०१५ असे दोन वेळा महाविद्यालयात मा. प्राचार्य डॉ. डी.व्ही.अतकरे यांचे मार्गदर्शनामध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. एकुण ६८ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. रा.से.यो. विभागाच्या वतीने दिनांक १५.०८.२०१४ ला महाविद्यालयाचे वसतीगृह परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. नियमित शिबीरामध्ये साफसफाई, मतदार जनजागृती रॅली, पल्स पोलिओ रॅली, हे कार्यक्रम राबविण्यात आले. दिनांक १२.०१.२०१५ ला स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली आणि दिनांक २३.०२.२०१५ ला संत गाडगेबाबा जयंती निमीत्त रॅली काढण्यात आली.

तसचे रा.से.यो. विभागाचे वतीने दत्तक ग्राम खडका येथे दिनांक ३१.०१.२०१५ ते ०७.०२.२०१५ पर्यंत विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. विशेष शिबीराचे दरम्यान स्वच्छता अभियान, वनराई बंधारा , सांस्कृतीक कार्यक्रम, इ. प्रकल्प राबविण्यात आले.

केतन येवले व पूनम डेहनकर या विद्यार्थ्यांची एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई येथे आयोजीत सात दिवसीय राज्यस्तरीय आव्हान स्पर्धेकरीता संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती तर्फे निवड करण्यात आली.

**राष्ट्रीय छात्र सेना :-** शैक्षणिक सत्र २०१४-१५ मध्ये एन.सी.सी. विभागामध्ये एकुण ३४ छात्र प्रवेशीत आहेत. ८ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. अमरावती अंतर्गत घेण्यात आलेल्या सर्व प्रशिक्षण शिबीरांमध्ये सर्व छात्र सहभागी झाले होते. २६ जानेवारी २०१५ ला नवी दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिन पथसंचलनासाठी कॅडेट वैभव शियाले, ईश्वर गावंडे, आणि शुभम कापसे यांची निवड झालेली आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या थलसेना शिबीराकरीता कॅडेट विजय काळभोर याची निवड झाली होती. राष्ट्रीय छात्र सेना खेळ व क्रि डा महोत्सवानिमित्त झालेल्या राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत कॅडेट ऋ पिकेश राऊत याने प्रतिनीधीत्व केले. नाशिक येथे संपन्न झालेल्या आर्मी अटॅचमेंट कॅम्प करिता कॅडेट प्रतिक श्रीराव व ब्रजमोहन जवादीया यांची निवड झाली होती. कॅडेट राहूल भगत व कोमलसिंग बघेल यांनी थलसैनिक

Scanned by CamScanner

शिबीरामध्ये सहभाग नोंदविला. औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलनासाठी कॅडेट रिंकू गाडगे व पुनम गाठे यांची निवड झाली होती. पथकातील कॅडेट सोनाली तेटू हिची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली आहे. पथकातील सर्व कॅडेट्सनी वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, पल्स पोलिओ शिबीर, स्वच्छता अभियान, मतदार जनजागृती अभियान, रस्ता सुरक्षा सप्ताह इ. मध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

महत्वाच्या विविध अभियानांमध्ये सहभागी होवून कॅडेट्स देशसेवा, त्याग व समर्पीत भावनांचा सदैव परिचय देत आहेत.

**सांस्कृतीक कार्यक्रम :-** शैक्षणिक सत्र २०१४-१५ मध्ये सांस्कृतीक समितीच्या माध्यमातुन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच नवीन पीडीस प्रेरणा मिळावी या उदात्त हेतुने महापुरूषांच्या जयंती व पुण्यतिथी तसेच विविध व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने आयोजीत केलेल्या युवा महोत्सवामध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतीक चमुने सहभाग घेवून आपल्या महाविद्यालयातर्फे लोकगीत व लोकनृत्याचे उत्कृष्ठ सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ११६ व्या जयंती उत्सवा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतीक चमूने लोकगीत व लोकनृत्य तसेच विविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण करण्यात आले. सांस्कृतीक समितीच्या कलावंतांनी स्वागत गीत व इतर समयोचित गीते सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळविली. संस्थेने ठरविलेल्या शिवोत्सव या विभागीय सांस्कृतीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नागपुर व अमरावती जिल्हयातील मोजक्या महाविद्यालयाच्या चमूने यात सहभाग नोंदविला. महाविद्यालयात गणेशोत्सव व शारदाउत्सव दरम्यान विद्यार्थ्यांचे सांस्कृतीक तसेच बौध्दीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच वर्षभर चालणा-या विविध सांस्कृतीक कार्यक्रमात चमूने सहभाग घेतला.

**विद्यापीठ परिक्षा निकालः-**

| अ.क्र | वर्ग | सन २०१४-१५ च्या परिक्षेचा निकाल | | |
|---|---|---|---|---|
| | | परिक्षेला बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | निकालाची टक्केवारी |
| १ | प्रथम वर्ष कला | ३२३ | ५४ | १६.७२ |
| २ | द्वितीय वर्ष कला | २०४ | ५८ | २८.४३ |
| ३ | तृतीय वर्ष कला | १०४ | ५७ | ५४.८१ |
| ४ | प्रथम वर्ष वाणिज्य | ३३८ | १४८ | ४३.७९ |
| ५ | द्वितीय वर्ष वाणिज्य | २६८ | १२५ | ४६.६४ |
| ६ | तृतीय वर्ष वाणिज्य | १८९ | ९१ | ४८.१५ |
| ७ | प्रथम वर्ष विज्ञान सेमी. १ | २५१ | ७२ | २८.६९ |
| ८ | प्रथम वर्ष विज्ञान सेमी. २ | २४१ | १४७ | ६१.०० |
| ९ | द्वितीय वर्ष विज्ञान सेमी. ३ | २११ | ९० | ४२.६५ |
| १० | द्वितीय वर्ष विज्ञान सेमी. ४ | २१० | ९२ | ४३.८१ |
| ११ | तृतीय वर्ष विज्ञान सेमी. ५ | १८० | ९९ | ५५.०० |
| १२ | तृतीय वर्ष विज्ञान सेमी. ६ | १८० | ११८ | ६५.५६ |
| १३ | एम.ए. भाग-१ अर्थशास्त्र | ५७ | २० | ३५.०९ |
| १४ | एम.ए. भाग-२ अर्थशास्त्र | २६ | १३ | ५०.०० |
| १५ | एम.ए. भाग-१ मराठी | २६ | १४ | ५३.८५ |
| १६ | एम.ए. भाग-२ मराठी | २० | १२ | ६०.०० |
| १७ | एम.ए. भाग-१ इंग्रजी | १३ | ० | ०.०० |
| १८ | एम.ए. भाग-२ इंग्रजी | १२ | ० | ०.०० |
| १९ | एम.कॉम. भाग-१ इंग्रजी सेमी.१ | ४२ | २१ | ५०.०० |
| २० | एम.कॉम. भाग-१ इंग्रजी सेमी.२ | ४२ | १६ | ३८.१० |
| २१ | एम.कॉम. भाग-२ इंग्रजी सेमी.३ | ३३ | २२ | ६६.६७ |
| २२ | एम.कॉम. भाग-२ इंग्रजी सेमी.४ | ३१ | २९ | ९३.५५ |
| २३ | एम.एस्सी. रसायनशास्त्र सेमी.१ | १८ | ०४ | २२.२२ |
| २४ | एम.एस्सी. रसायनशास्त्र सेमी.२ | १७ | ०७ | ४१.१८ |
| २५ | एम.एस्सी. रसायनशास्त्र सेमी.३ | १५ | ०९ | ६०.०० |
| २६ | एम.एस्सी. रसायनशास्त्र सेमी.४ | १४ | ०८ | ५७.१४ |

Scanned by CamScanner

**मान्यवरांच्या भेटी:-** सन २०१४-१५ मध्ये महात्मा फुले व्याख्यानमाला अतंर्गत डॉ. कोमल ठाकरे कला, वाणिज्य महाविद्यालय ,कोराडी. यांचे व्याख्यान आयोजीत केले. स्व. माजी प्राचार्य पी.डी.चौधरी स्मृतीव्याख्यानमाला अंतर्गत डॉ. पी.आर.राजपुत, विद्याभारती महाविद्यालय, अमरावती. यांचे व्याख्यान आयोजीत केले. तसेच स्व. सीतारामजी चौधरी स्मृतीव्याख्यानमाला अतंर्गत डॉ.टी.एम.करडे, गणिततज्ञ , नागपुर यांचे व्याख्यान आयोजीत केले. स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने महाविद्यालयाने ' नरेंन्द्र ते विवेकानंद' या विषयावर कार्यक्रम आयोजीत केला. सदर कार्यक्रमाला मा. डॉ. कुमार शास्त्री , नागपुर यांचे व्याख्यान आयोजीत केले. राष्ट्रसंतांच्या ग्राम गीतेवर डॉ. बी.आर. विघे यांचे व्याख्यान आयोजीत केले. डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख जयंती निमित्त डॉ. रविंन्द्र शोभणे यांचे व्याख्यान आयोजीत केले. रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय अमरावती यांचे मार्फत तालुका स्तरीय शैक्षणिक अभियान स्पर्धा परिक्षेसाठी मार्गदर्शन या कार्यक्रमाच्या प्रसंगी मा.डॉ. रणजीत पाटील , राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य , श्री. एस.आर.काळबांडे, उपसंचालक, मा. खा. रामदासजी तडस, खासदार, मा. अनिलजी बोंडे, आमदार , मा. ललीतकुमार व-हाडे एस.डी.ओ. या मान्यवरांची उपस्थिती लाभली.

महाविद्यालयातील विविध कार्यक्रमाला मा. ॲड. अरुणभाऊ शेळके, अध्यक्ष श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती. , उपाध्यक्ष मा. श्री. महादेवराव भुईभार, उपध्यक्ष मा. वसंतरावजी चर्जन, मा. डॉ. सुरेश ठाकरे, कोषाध्यक्ष मा. श्री. ह.बा.ठाकरे, कार्यकारीणी सदस्य ॲड. एम.के.नाना देशमुख, मा. जगन्नाथभाऊजी वानखडे, मा. श्री. नरेशचंन्द्र जी ठाकरे, मा. ॲड. गजानन पुंडकर, सचिव, मा. वि.गो. भांबुरकर, मा. प्रा.श्री. अरुण सांगोळे, स्विकृत सदस्य, मा. सौ. आर.आर.सावरकर, स्विकृत सदस्या, इ. संस्थेचे मान्यवर तसेच स्थानिय व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.श्री. सुरेंन्द्र आंडे, मा. श्री. अनिल तालुकदार यांच्या सदिच्छा भेटी व मार्गदर्शन महाविद्यालयास लाभले.

महाविद्यालयात आयोजीत कार्यक्रमाच्या निमीत्ताने मा. सचिन बुरघाटे, प्रा. अरुण धनवटे, सिनेट सदस्य व बी.सी.यु.डी. सदस्य संगाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. डॉ. जे.ए.तिडके, प्र.कुलगुरु, संगाबा अमरावती विद्यापीठ ,अमरावती. डॉ. विनोद भटकर विभाग प्रमुख, श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती. , डॉ. पी.डब्ल्यु. देवते, विभाग प्रमुख वनस्पतीशास्त्र श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती. मा. अर्जुन ठोसरे ठाणेदार वरुड. तसचे वरूड शहरातील व परिसरातील मान्यवरांनी भेटी दिल्यात.

महाविद्यालयाचे शैक्षणिक व विकासात्मक कार्य मा. ॲड. अरूणभाऊ शेळके, अध्यक्ष, श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती. व पदाधिकारी श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती. , स्थानिय व्यवस्थापन समितीचे सदस्य व संस्थेचे आजिव सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन प्राध्यापक व कर्मचारी यांच्या सहकार्याने पार पडत आहे. यापुढेही यांच्याकडुन असेच मार्गदर्शन व सहकार्य मिळत राहील ही अपेक्षा.

( डॉ. डी.व्ही.अतकरे)
प्राचार्य/ सचिव
स्थानिय व्यवस्थापन समिती,
महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी
चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड.

Scanned by CamScanner